अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

रविवार, दि. ०२ सप्टेंबर २०१८ ▸ वर्ष : १६ वे ▸ अंक : ३३३

# कामगारांच्या मुलांना मिळणार प्रशासकीय सेवेत संधी : देशमुख



बक्षीस वितरण कार्यक्रमचे दिपप्रज्वलन करताना पालमंत्री विजयकुमार देशमुख.

सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने राज्यस्तरीय समरगीत/स्फूर्तीगीत स्पर्धेचे पारितोषिक वितरण व स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण योजनेचा उद्घाटन समारंभ पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करुन करण्यात आला.

यावेळी लक्ष्मी हायड्रोलिक्सचे व्यवस्थापकीय संचालक शरदकृष्ण ठाकरे, ज्येष्ठ व्याख्याते जयंत करंदीकर, नाशिक मधील स्पेक्ट्रम ॲकॅडमी, सुनील पाटील लक्ष्मीकांत नड्डम-नगरसेवक आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांनी या स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन झाले असे जाहीर करुन स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षणासाठी ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी ही कमी असून आणखी जास्तीत जास्त कामगारांच्या पाल्यास सहभागी करुन घेण्यात यावे, याकरिता दिलेला निधी कमी पडत असेल तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन निधी वाढवून देणेबाबत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

राज्यस्तरीय समरगीत/स्फूर्तिगीत स्पर्धेचे हुतात्मा स्मृती मंदिरात ३० ऑगस्ट रोजी केले होते. यात सोलापूरसह मुंबई येथील नायगाव, अंधेरी, वरळी, ठाणे, चिपळूण, पुणे, कोल्हापूर, सांगली, नागपूर, नाशिक, जळगाव, अकोला, अमरावती, चंद्रपूर, औरंगाबाद, नांदेड, लातूर येथील किमान २३० कलावंतांचा सहभाग होता. परीक्षकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येऊन स्पर्धेला प्रारंभ करण्यात आला.

दिवसभर चाललेली ही स्पर्धा अत्यंत चुरशीत पार पडली. एकापेक्षा एक सादर झालेल्या सरस समरगीत व स्फूर्तिगीताने सारे वातावरण भक्तीमय झाले होते. संपूर्ण स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्यानंतर स्पर्धेचा पारितोषिक वितरणप्रसंगी प्रास्ताविक व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत सतीश दाभाडे यांनी केले.